

# ऑगस्ट क्रांती



कविता संग्रह

विजय अष्टेकर

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



# लेखकाचे मनोगत...

माझे कविते बद्दलचे मत, थोडक्यात कविता कशी निर्माण झाली हे सांगण्यासाठी आणि आपणच आपल्याबद्दल काय लिहू शकतो हे समजणे हा यामागचा उद्देश.

आज कविता लिहिताना आश्चर्य वाटते, कारण शाळेत असताना जेव्हा पहिल्यांदा कवितेशी संबंध आला, तेव्हा ते अवघड प्रकरण होते. कारण कविता समजणे हेच मुळात प्रश्नचिन्ह होते. धडे कितीही वाचावयास सांगा पण कविता नको. आज अगदी उलटी परिस्थिती आहे. कोणतीही कविता वाचायची आणि त्यावर अर्थपूर्ण चर्चा (पुणेरी) करायची तयारी आहे.

"शायरी" या शीर्षकाखाली काही हिंदी भाषेत सुध्दा कविता लिहिलेल्या आहेत.

संग्रहाचे नाव **ऑगस्ट क्रांती** हे समर्पक आहे किंवा कसे हे वाचकच ठरवतील. दि. ९ ऑगस्ट २०१२ रोजी पहिली कविता किंवा लिखाण कागदावर उतरले म्हणून हे शीर्षक.

आपल्या सर्वांच्याच मनात अनेक विचार नेहमीच येतात. काहीजण ते व्यक्त करतात आणि मग असं काहीतरी जमून जातं. लिहितांना हा विचार कधीच मनाला शिवला नाही की जे लिहितो आहे ते वाचकांना रुचेल की नाही. आपल्याला जे वाटते ते लिहिणे एवढाच उद्देश होता व अजूनही आहे.

जसजसा आकडा वाढू लागला तेव्हां वाटू लागले पुस्तक तयार करता आले तर बघावे. कवितांची पन्नाशी गाठल्यावर प्रयत्न करायचा असे ठरवले. मला आवडलेल्या काही कविता नामांकित प्रकाशकांकडे पाठविल्या, पण त्यांनी वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

काहीजणांनी हा प्रश्न विचारला की हे कसे सुचते. खरे तर यावर समाधानकारक उत्तर नाही. काही कविता अक्षरशः पंधरा मिनिटांत लिहून पूर्ण झाल्या. काही विषय मात्र जसे सुचत होते तसे लिहून ठेवत होतो. अजूनही काही विषय आहेत पण कविता नाहीत. कारण सुचल्याच नाहीत. समाधानाची आणखी एक गोष्ट म्हणजे विषय वेगवेगळे सुचत गेले, त्यामुळे तोचतोचपणा टाळता आला.

आणखी एक वैशिष्ठ्य असे की कविता प्रतीकात्मक आहेत, वर्णनात्मक आहेत.

काही विचार डोक्यात असे आहेत की ज्यावर कविता नाही पण परिच्छेद लिहिता येतील असे वाटते. प्रयत्न करुन पाहायचा आहे.

"तेथे कर माझे जुळती" ही कविता सगळ्यात महत्वाची. आश्चर्य वाटते की हे शब्द लिहिताना सुध्दा भावनाविवश व्हायला होते. खरे तर या कवितेला शीर्षक "लता" असे द्यायचे होते. परंतु जसजसे लिहीत गेलो "तेथे कर माझे जुळती" ही ओळ एवढी चपखलपणे सर्व कडव्यांमध्ये बसली की हेच कवितेचे शीर्षक असावे असे वाटले आणि तितकेच ते समर्पकही ठरले.

कधी कधी असे देखील वाटले की ही कला जशी अचानक उपजली तशीच ती अचानक लुप्त होते की काय कारण महिना-महिना काही सुचलेच नाही. कधीतरी एखाद्या विषयावर काहीतरी सुचते आणि ते लिहिले जाते पण पूर्ण होत नाही. नंतर कधीतरी त्यावर पुन्हा विचार केल्यावर जमून जाते. आता ह्या गोष्टीची खात्री पटते की ठरवून केलेली कविता तेवढी जमत नाही, जेवढी उस्फूर्तपणे एखादी सुचते.

आणखी एका गोष्टीची खात्री पटली की जो व्यवसाय करतो आहे त्याच्या जोडीला एखादी कला असणे, किमान एखादा छंद असणे अत्यंत आवश्यक आहे. कायदा, सरकारी खाते आणि अशील यांच्या त्रिकोणात सापडला की माणूस जास्ती प्रॅक्टीकल होतो.

या काव्यरचना करीत असताना काही प्रश्न पडतात, जसे की कविता नेमके कशाला म्हणायचे? यमक जुळणे किती आवश्यक आहे? लांबी रुंदी किती असावी? कडवे असावे की नाही? असले तर किती? कवितेला शीर्षक असावे की कसे? चाल लावता आली पाहिजे की नाही? कवितेच्या तांत्रिक बाजू काय असतात ? कवितेचे प्रकार कोणते आणि किती?

असे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. कधीतरी कोणाकडून तरी समाधानकारक उत्तरे मिळतील. सध्या तरी सुचेल ते लिहिणे एवढेच उद्दिष्ट आहे. वाचकांकडून प्रामाणिक आणि परखड समीक्षेची अपेक्षा आहे जेणेकरुन हा प्रवास चालू ठेवणे किंवा थांबविणे हे ठरवता येईल.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | एक विचार | १ |
| २) | Life | २ |
| ३) | मृगजळ | ५ |
| ४) | एक क्षण | ६ |
| ५) | माझी कविता | ७ |
| ६) | प्रतिज्ञा | ८ |
| ७) | तो | ९ |
| ८) | छत्रपती | १० |
| ९) | बंध रेशमाचे | ११ |
| १०) | हस्तरेषा | १२ |
| ११) | अमिताभ | १३ |
| १२) | शाळा | १६ |
| १३) | मदिरा | १७ |
| १४) | आठवण | १८ |
| १५) | एकमेका पाहू पाण्यात | १९ |
| १६) | सुख-दुःख | २० |
| १७) | ते मंतरलेले दिवस | २१ |
| १८) | तेथे कर माझे जुळती | २२ |
| १९) | हे ईश्वरा | २३ |
| २०) | बन्सी दादा | २४ |
| २१) | अनंताची जत्रा | २५ |
| २२) | प्रतिक्षा | २६ |
| २३) | हरवलेले बालपण | २७ |
| २४) | शिमगा | २८ |
| २५) | Beer | २९ |
| २६) | सोनेरी परंपरा | ३० |
| २७) | आणि भांडण सुरु झालं | ३१ |
| २८) | आयुष्य | ३२ |

| | | |
|---|---|---|
| २९) | वाढदिवस | ३३ |
| ३०) | सावली | ३४ |
| ३१) | व्यथा | ३५ |
| ३२) | प्रियकरा | ३६ |
| ३३) | आठ | ३७ |
| ३४) | Hitler | ३८ |
| ३५) | कोकणस्थी बाणा | ३९ |
| ३६) | निसर्ग | ४० |
| ३७) | काही सांगायचं राहून गेलं | ४१ |
| ३८) | वाह ताज | ४२ |
| ३९) | पुकार | ४३ |
| ४०) | हॅण्डसेट | ४४ |
| ४१) | नाती-गोती | ४५ |
| ४२) | दीक्षितांची माधुरी | ४६ |
| ४३) | ओळखून आहे मी मला | ४७ |
| ४४) | Missing Something | ४८ |
| ४५) | शब्दांची किमया | ४९ |
| ४६) | आशा | ५० |
| ४७) | बाबा | ५१ |
| ४८) | मला काय करायचयं? | ५२ |
| ४९) | Pegasus - A Health Club | ५३ |
| ५०) | ऊन-पाऊस | ५४ |
| ५१) | Prof. Zaware | ५५ |
| ५२) | सुंदरा सातारकर | ५६ |
| ५३) | नंदू सबका बंधू | ५७ |
| ५४) | दिन-विशेष | ५८ |
| ५५) | प्रेमगाथा | ५९ |
| ५६) | सोनाली - एक मैत्रीण | ६० |

# एक विचार

ही कविता असावी असे कधी वाटले नव्हते,
जे सुचले ते लिहित गेलो.

सुख आहे पण त्याला दुःखाची झालर आहे
आनंद आहे पण त्यावर भीतीचे सावट आहे

आशा आहे पण त्याला नैराश्याची जोड आहे
अपेक्षा आहे पण अपेक्षाभंगाची भीती आहे

भेट आहे पण विरहाची जाणीव आहे
प्रेम आहे पण उपेक्षेची व्यथा आहे

समाधान आहे पण त्याला असमाधानाची किनार आहे
उत्साह आहे पण उदासिनता बरोबर आहे

प्रगती आहे पण अधोगतीचीही तयारी आहे
भावना आहेत पण भावनांची कदर अपेक्षित आहे

विश्वास आहे पण आत्मविश्वासाची गरज आहे
स्वप्न आहेत पण पूर्ण होण्याची शाश्वती हवी आहे

अभिमान आहे पण स्वाभिमानाची जास्त आवश्यकता आहे
मन उल्हसित आहे पण शरीर थकलेले आहे

उंच झेपावण्याची इच्छा आहे त्याला कर्तृत्वाची जोड हवी आहे
स्पर्धेत यश मिळवले आहे पण त्याला गर्वाची नशा आहे

ज्ञानप्राप्तीची ओढ आहे पण त्याला विनयाची आवश्यकता आहे
स्वार्थ असणे स्वाभाविक आहे पण परमार्थही तितकाच महत्वाचा आहे

ही विचारांची मालिका बनून गेली.
कदाचित त्यातील काही ओळी ह्या
सुविचार म्हणून गणल्या जाऊ शकतात.

What is life
Life is a game
Everyone has to play it
You win it or you will loose it

What is life
Life is love
Everyone has to experience it
You get it or you will miss it

What is life
Life is journey
Everyone has to travel it
You reach the destination or you will get lost

What is life
Life is a battle
Everyone has to fight it
You win it or you will get finished

What is life
Life is an emotion
Everyone has to feel about it
You express it or you suppress it

What is life
Life is an experience
Everyone has to gain it
You learn out of it or pay for it

# *Life*

What is life
Life is culture
Everyone has to follow it
You adopt it or you will get ruined

What is life
Life is a movie
Everyone has to watch it
You live it or you leave it

What is life
Life is a duty
Everyone has to perform it
You do it or you will pay for it

What is life
Life is happiness
Everyone has to achieve it
You attempt for it or you will starve for it

What is life
Life is a destiny
Everyone has to reach it
You start moving or you will never reach it

What is life
Life is sorrow
Everyone has to bear with it
You forget it or you will suffer from it

# *Life*

What is life
Life is satisfaction
Everyone has to achieve it
You get satisfied or you will get frustrated

What is life
Life is a competition
Everyone has to run into it
You be a part of it or you will be out of it

What is life
Life is a secret
Everyone has to know it
You open it or others will open it

What is life
Life is a song
Everyone has to sing it
You sing it or you will have to listen to it

What is life
Life is an art
Everyone has to be an artist
You construct something or it will destruct you

What is life
Life is a challenge
Everyone has to accept it
You take it or it will challenge you

# मृगजळ

ही कविता अचानक सुचली नाही
हा विषय किंवा यातील ओळी अनेक दिवस,
महिने, वर्षे डोक्यात होत्या.
मनाच्या विविध अवस्था रेखाटण्याचा हा प्रयत्न.

मी काय शोधतो आहे
मला काय हवे आहे
मी कशाच्या मागे धावतो आहे
एक मिळाले की दुसयाची अपेक्षा आहे
हेच तर मृगजळ आहे

मृगजळा मागे धावणे व्यर्थ आहे
पण त्यामुळेच तर आयुष्याला अर्थ आहे
जीवन सतत वाहणाया झया सारखे असावे
साठलेल्या पाण्याच्या डबक्या सारखे नसावे

मन आज उदास आहे
असे वाटते आयुष्य हा वनवास आहे
त्याचवेळी ही जाणीव सुखावह आहे
मला तुझा सदैव सहवास आहे

कधी वाटते या क्षणी हा प्रवास संपावा
पण पुन्हा मृगजळाची लालसा मनाला भुरळ पाडते आहे

आपण कोठून येतो कोठे जातो
हा प्रवास का संपतो
सगळेच प्रश्न अनुत्तरित आहेत
उत्तरे शोधण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे
उत्तरे मिळाली तर मात्र अनर्थ आहे
आयुष्याचे गूढ अनाकलनीय आहे
कदाचित यामुळेच आयुष्याला अर्थ आहे

# एक क्षण

सुचण्यामागे विचार असा होता की
कोणतीही घटना, प्रसंग, सुख, दुःख हे
चिरंतन कधीच नसतात.
पुढच्या क्षणी ते भूतकाळात जमा होतात
त्यांचा चांगला अथवा वाईट प्रभाव
काही काळ टिकून राहतो.

क्षण आला क्षण गेला
कधी सुख दिले कधी दुःख दिले
तरी चिरंतन असे काहीच नव्हते

क्षणाची त्या ताकद तरी किती
कधी आयुष्य ढवळून निघते
कधी आयुष्य झळाळून निघते
कधी आकाश कोसळते
कधी स्वर्गीय सुख लाभते

क्षण पकडून ठेवता येत नाही ही व्यथा आहे
हीच तर आयुष्याची कथा आहे
क्षणात ऊन आहे, क्षणात पाऊस आहे
क्षणाचीच रात्र आहे, क्षणाचाच दिवस आहे
एका क्षणात होत्याचे नव्हते होते
क्षणातच आयुष्याचे गूढ उमजते

एका क्षणाचे मोल तरी किती
म्हटले तर लाख मोलाचे, म्हटले तर कवडी मोलाचे

क्षणात हसावे, क्षणात रडावे
क्षणात आठवावे, क्षणात विसरावे
परंतु सर्व भावना क्षणिक आहेत
हे न विसरता लक्षात ठेवावे
म्हणूनच या क्षणाचा मी सदैव ऋणी आहे

# माझी कविता

या विषयावर कविता होणे अत्यंत आवश्यक होते
कारण जीवनाला एक वेगळी दिशा तिने दिली होती.

कविता तू कुठून आलीस
तू का आलीस, केव्हा आलीस
आजपर्यंत तू कुठे होतीस

किती वाट पाहिली मी तुझी
तुला कशी आठवण झाली नाही माझी
तुझ्याविणा मी किती अपूर्ण होतो
तू जवळ असून सुध्दा तुझ्यापासून दूर होतो

तुला सतत पाहावेसे वाटते
तुझ्याशी सतत बोलावेसे वाटते
तुझ्या सहवासात स्वतःला विसरुन जावेसे वाटते

कधी तू आशावादी असतेस
कधी तू निराशावादी असतेस
कधी तू प्रेमळ वाटतेस तर
कधी तू कठोर भासतेस

कधी तू सुंदर असतेस
कधी तू कुरुप दिसतेस

कधी तुझे कौतुक करावेसे वाटते तर
कधी तुझी उपेक्षा करावीशी वाटते
तरी सुध्दा हे कबूल करावेसे वाटते

आपुले नाते कधी न तुटणारे
हे ऋणानुबंध कधी न संपणारे
मैत्रीचे हे बंध चिरंतन टिकणारे
आयुष्य उजळवून टाकणारे

# प्रतिज्ञा

माझ्या मते प्रत्येकाने आयुष्यात प्रतिज्ञा
केलीच पाहिजे आणि तिचे पालन केलेच पाहिजे
मग ती वैयक्तिक असो अथवा सामुदायिक

प्रतिज्ञा अशी असावी
जिचे रोज स्मरण व्हावे
जिचे सहज आकलन व्हावे
जिचे रोज अनुकरण करावे
जिचे निवेदन इतरांना करता यावे
जिच्या आचरणाने आयुष्य समृध्द व्हावे

प्रतिज्ञा अशी असावी
जिच्या ऐकण्याने स्वाभिमान जागृत व्हावा
जिच्या ऐकण्याने शत्रूला धडकी भरावी
जिच्या रुपाने संस्कृतीचे दर्शन व्हावे
जिच्या विस्मरणाने मन व्यथित व्हावे
जिच्या वदनाने सहस्त्र गजांचे बळ यावे

प्रतिज्ञा अशी असावी
जी कधी न विसरावी
जी कालानुरुप बदलत रहावी
जिची किर्ती चहूकडे पसरावी
जिची थोरवी प्रत्येकाने गावी
जिची जाणीव मनाला उल्हसित करावी
जिची उणीव चित्त विचलित करावी

प्रतिज्ञा अशी असावी
जिच्यामुळे स्वाभिमानाने जगता यावे
जिच्यामुळे सर्वांचे कल्याण व्हावे
जिच्यासाठी जीवन समर्पित करावे
जिच्यासाठी आयुष्य पणाला लावावे
जी भीष्मप्रतिज्ञा ठरावी

# तो

ही कविता स्त्रीच्या कल्पनेतला आदर्श पुरुष
अशी संकल्पना मनात ठेवून लिहिली.

तो असा असावा, तो तसा असावा
त्याने माझ्यासाठी हे करावे, ते करावे
त्याने माझ्यावर खूप प्रेम करावे
त्याने माझ्याशिवाय कुणाचाही विचार करु नये

तो हुशार असावा, तो कर्तृत्ववान असावा
तो खिलाडू वृत्तीचा असावा
तो संतुलित मनाचा असावा
तो समृध्द विचारांचा असावा

माझ्या आयुष्यात फक्त तो असावा
मी त्याच्यावर खूप प्रेम करावे
त्याची स्वप्ने ही माझी स्वप्ने असावीत
त्याच्या सुख दुःखात मी त्याला साथ द्यावी

माझे प्रेम हे राधेचे असावे, मीरेचे असावे
ते गंगेचे असावे, सती पार्वतीचे असावे
सोनी, हीर, लैला, जुलीएट चे असावे
देवदास कथेतल्या चंद्रमुखीचे असावे

मी तुझ्यावर प्रेम करावे हा माझा हक्क असावा
तू कुणावर प्रेम करावे हा तुझा अधिकार असावा
मी फक्त तुझीच आहे हे माझे वचन आहे
तू फक्त माझाच असावास ही इच्छा आहे
तुझ्याशिवाय आयुष्य नसावे ही देवाला प्रार्थना आहे.

## छत्रपती

लिहिण्यामागे ठाम विचार होता.
महाराष्ट्राचे दैवत असलेल्या आणि ज्यांच्या
कर्तृत्वाने माझ्या आयुष्यावर मोठा परिणाम झाला
असल्याने त्यांच्यावर शक्य ते लिहिणे ही गरज होती.

प्रतिज्ञा केली स्वराज्य स्थापनेची
हिंदवी स्वराज्याच्या उभारणीची
परावलंबित्व झुगारुन देण्याची
अन्यायाविरुध्द लढा देण्याची

आई भवानीची तलवार होती साथीला
सवंगड्यांची फौज होती मदतीला
माता जिजाईची शिकवण होती दिशा दाखवायला
पिता शहाजीराजांची मूक संमती होती साहसाला
थोरामोठयांचे आशीर्वाद होते बळ द्यायला
संत महात्म्यांचे मार्गदर्शन होते युध्द जिंकायला

साक्षात भगवान शंकरांची कृपा दृष्टी होती
हे हिंदवी स्वराज्य व्हावे ही श्रींची इच्छा होती
स्वकीयांना पारतंत्र्यातून मुक्त करावे ही एकच भावना होती

अनेक शत्रूंशी संघर्ष करुन स्वराज्य स्थापले
या संघर्षात अनेक सवंगडी कामास आले
सर्व धर्मातल्या लोकांना सन्मानाने वागवले
सर्व थरातल्या लोकांना बरोबर घेऊन राज्य चालवले
आप्तस्वकीयांच्या कुरबुरीने मन विषण्ण झाले
आकस्मिक मृत्युने स्वराज्यावर संकट कोसळले

शिवरायांचे आठवावे रुप आठवावा प्रताप

# बंध रेशमाचे

या कवितेची उत्पत्ती ठरवून एखाद्या विषयावर
लिहिता येते की नाही या मुद्यावरुन झाली.

स्त्री पुरुषाचे नाते कसे असावे
ते केवळ देण्याघेण्याचे नसावे
मित्रत्वाचे त्याला कवच असावे
एकनिष्ठतेचे त्याला बंधन असावे

या नात्याचे ओझे कधी वाटू नये
या नात्यातले प्रेम कधी आटू नये
या नात्याची ओढ सतत वाढत रहावी
या नात्याची दोघांनी नेहमीच काळजी घ्यावी

या नात्याविना आयुष्य अपूर्ण असते
हे नाते तुमचे जीवन समृध्द करते
या नात्याचे महत्व अनेकांना कळते
परंतु काही जणांनाच ते वळते

नाते किती ताणावे हे ज्याचे त्याने ठरवावे
नाते तुटणार नाही याचे दोघांनी भान ठेवावे
रक्ताचे नाते ताणले तरी तुटत नाही
हे नाते मात्र तुटले की जुळत नाही

कोणतेही नाते हे विश्वासाचे असावे
ते कधीही गैरसमजाचे नसावे
शक्य असेल तर तडजोडीचे असावे
जबरदस्तीचे मात्र खचितच नसावे
त्याला कोणतेही नाव नसावे

# हस्तरेषा



लहानपणी कधीतरी हस्तरेषा पहाण्याचा,
अभ्यास करण्याचा छंद जडला.
अजूनही कधीतरी एखादा हात पाहिला जातो.
त्या छंदावर कविता असणे स्वाभाविक होते.

लोक म्हणतात हात दाखवून अवलक्षण कशाला
मी म्हणतो दोष का द्यावा नशिबाला
हस्तरेषांवर विश्वास ठेवावा की ठेवू नये
काही असले तरी त्यांच्या आहारी मात्र जाऊ नये

उभ्या, आडव्या, तिरक्या रेषा काय सांगतात
म्हटलं तर आयुष्याचं गुपित सांगतात
काही चांगलं सांगतात काही वाईट सांगतात
विधिलिखित अटळ आहे हे मात्र नक्की सांगतात

हात पाहताना समोर दिसतात अनेक रेषा
आयुष्य रेषा, मस्तक रेषा, धन रेषा, हृदय रेषा
एक रेषा मात्र आपण पाहण्याचे टाळतो
ती म्हणजे लक्ष्मण रेषा

असे म्हणतात शहाण्या माणसाने हात दाखवू नये
ज्याने दाखवला त्याला मूर्खात काढू नये
हात दाखवण्याचे फायदे अनेक, तोटे अनेक
एकामागून एक असे फसतात अनेक

कोणी हात दाखवून आनंदी होतो, कोणी दुःखी होतो
हात पाहणारा मात्र नेहमीच सुखी होतो
कर्तृत्ववान माणूस हाताच्या रेषा स्वतः ओढतो
नाकर्ता माणूस केवळ हात चोळत बसतो

कळत नव्हते तेव्हांपासून सिनेमे बघत होतो.
कळायला लागले तेव्हांपासून अमिताभ इतके
कोणी भावलेच नाही.

# अमिताभ

एक साधा माणूस व्हायचे होते नायक
रेषा उमटली आणि बनला महानायक
कष्ट करावे लागले उंचीसारखे
यशही मिळाले उंचीसारखे

अँग्रीयंग मॅन म्हणून ख्याती मिळाली
एकमेव सुपरस्टार असल्याची पावती मिळाली
दैवी देणगी होती आवाजाची
किमया केली त्याने डायलॉग डिलिव्हरीची
वन मॅन इंडस्ट्री म्हणून नावलौकीक मिळाला
चाहत्यांना त्यांच्या स्वप्नातला हिरो मिळाला

उत्तुंग यशामागे आहे कष्टांची कडी मेहनत
पाय जमिनीवर आहेत म्हणून तर यश येते धावत
विनयशीलता अशी जिचे कौतुक करावे
व्यक्तिमत्व असे ज्याच्यामुळे भारावून जावे

पडद्यावरच्या एन्ट्रीने टाळयांचा कडकडाट होतो
कडक डायलॉग डिलीव्हरीने विजांचा लखलखाट होतो
हातापायांच्या हालचालीने गुन्हेगारांचा थरथराट होतो
विनोदी अभिनयाने हास्यांचा खळखळाट होतो

वेडे प्रेक्षक एन्ट्रीला पैशांची ऊधळण करतात
शहाणे त्यातून आपल्या चहापाण्याची सोय करतात
एका झलकेसाठी चाहते वर्षानुवर्षे वाट पाहतात
के बी सी मध्ये भेट झाली तर आयुष्याचे
सार्थक झाले असे मानतात

यश चाखले, अपयश अनुभवले
गौरव पाहिला, अवहेलना सोसली
संपत्ती मिळवली, चणचण पाहिली
मानसिक क्लेश, शारीरिक व्याधी सोसल्या
चाहत्यांच्या प्रेमाने, आशीर्वादाने सगळ्यावर मात केली
के बी सी च्या माध्यमाने एकमेव द्वितीय
असल्याची मुद्रा उमटवली

तू आलास, तू पाहिलेस, तू जिंकलेस
तुझ्या अदाकारीने चाहत्यांना तू आपलेसे केलेस
अन्यायाने पिडीत लोकांचा तू मसीहा ठरलास
कष्टाने यश प्राप्त होते याचा आदर्श घालून दिलास
मिठ्ठास वाणीच्या जादूने सर्वांना निरुत्तर केलेस
वेळ आणि शब्दांची किंमत न करणायांच्या
डोळ्यात अंजन घातलेस



चाहत्यांनी तुझा आदर्श ठेवावा ही त्यांची मनोवृत्ती आहे
चाहत्यांच्या भावनांची कदर करणे ही तुझी वृत्ती आहे
दिलेली भूमिका पूर्ण ताकदीने करणे ही प्रवृत्ती आहे
इतरांच्या कामात ढवळाढवळ न करणे ही संस्कृती आहे.

अभिनयाचा तू शहेनशहा आहेस
इंडस्ट्रीचा तू एकमेव सिकंदर आहेस
चाहत्यांशी तुझा याराना आहे
जगण्यात तुझ्या शान आहे
आम्हाला तुझा अभिमान आहे

देशप्रेमी ही तुझी ओळख आहे
इन्कलाब जिंदाबाद हा तुझा नारा आहे
ॲक्शन मध्ये तू बेमिसाल आहेस
सर्वांशी तुझा दोस्ताना आहे

पडद्याबाहेरचे दो और दो पांचचे गणित चुकले
तेव्हा तू अकेला होतास
चुकीच्या निर्णयाचा जुर्माना तू भरलास

अभिनय हीच तुझी शक्ती आहे
इंडस्ट्रीचा तू डॉन आहेस
सातवा हिंदुस्तानी हाच खरा जादूगार आहे

कालियाने गंगा की सौगंध घेतली
खून पसीना एक केला
डोळ्यात शोले होते
हातात त्रिशूल होते
हातापायातल्या जंजीर तोडल्या
वाटेत येणारी प्रत्येक दीवार पाडली
तेव्हा कुठे नशीबाचे दरवाजे उघडले

मिलीच्या सिलसिल्याने मि. नटवरलाल मजबूर झाला
कभी कभी म्हणत कायमचा गिरफ्तार झाला

# शाळा

हा विषय तर प्रत्येकाच्या जिवाळ्याचा.
कटू, गोड आठवणींचा, त्यावर काहीतरी
लिहिणे हे तर कर्तव्यच असे मानतो मी.

शाळेतल्या आठवणी सगळ्यांनाच असतात
कुणाला गोड असतात, कुणाला कटू असतात
रम्य ते दिवस रम्य त्या आठवणी
सगळ्याच नाही तरी लक्षात राहतात काहीजणी

अनेक वर्षांच्या विरहानंतर पुनः भेटी होतात
परस्पर ओढीच्या आठवणी पुनः जागृत होतात
शाळा चांगल्या वाईट अनुभवांची साक्षीदार असते
विद्यार्थ्यांना दिलेल्या संपत्तीची ती दावेदार असते

शाळा आपली असते आपण शाळेचे असतो
जगाच्या पाठीवर कुठेही असलो तरी पुनः तेथे येतो
गुरुजनांच्या शिकवणीची बरोबर असते शिदोरी
सवंगड्यांच्या स्नेहाची बळकट असते दोरी

ते प्रश्न, ती उत्तरे, दिवसरात्रीचा अभ्यास
परीक्षा आणि निकालांचे अजून होतात भास
वर्गातले खेळ, मैदानी खेळ, वार्षिक स्नेलसंमेलन
आठवणींच्या रुपाने पुनः मिळते ते बालपण

गेट टुगेदरच्या निमित्ताने पुनः भेटणे होते
जुन्या प्रसंगांना उजाळा देवून मन प्रफुल्लित होते
सर्वांच्या बरोबर आपण भूतकाळात जातो
थोडावेळ का होईना वर्तमान विसरतो
पुनः भेटण्याचे वायदे करुन विभक्त होतो
दुसया दिवसापासून प्रत्येकजण रुटीनला लागतो

यावर दुमत नक्कीच असू शकते.
यात तिचे समर्थन करणे हा उद्देश  नक्कीच नाही.

# मदिरा

पुरुषांनी तिला सखी म्हणावे
स्त्रियांनी तिला वैरी म्हणावे
कोणीही तिला काहीही म्हणावे
अधूनमधून तिला जवळ करावे

कुणी सुखात तिला जवळ करतो
कुणी दुःखात तिला जवळ करतो
कुणी सवय म्हणून जवळ करतो
कुणी व्यसन म्हणून जवळ करतो

घेताना तिला औषध मानावे
घेतल्यावर तिला हलाहल मानावे
चढेपर्यंत घेत राहावे
चढल्यावर मात्र उतारा मानावे

देवदेवतांनी तिला प्रसाद मानले
असुरांनी तिला आहार मानले
आपणच का तिला नशा मानावे
शक्य असेल तेव्हा घेत राहावे

मदिरा घेणायाशी प्रामाणिक असते
न घेणायाला ती मोहात पाडते
आयुष्यात एकदा तरी प्राशन करावे
नंतर मात्र तिचे राशन करावे

# आठवण

ही तर आपली मैत्रीण असते.
कधी सुंदर तर कधी कुरुप होऊन
आपल्या समोर येते. प्रयत्न करुन सुध्दा
तिला जवळ अथवा दूर करता येत नाही.

आठवण होता एका प्रसंगाची
रोमांच शरीरावर फुलती
आठवण होता एका प्रसंगाची
शहारे अंगावर उठती

आठवण त्या प्रसंगाची
भूतकाळात घेऊन जाती
आठवण त्या प्रसंगाची
भरलेल्या जखमा ओल्या करुन जाती

आठवण होता एका व्यक्तीची
हृदयाची स्पंदने वाढू लागती
आठवण होता एका व्यक्तीची
विचारांची वादळे उठू लागती

आठवण येता त्या व्यक्तीची
वर्तमान विसरुन भूतकाळात जावे
कल्पनेच्या विश्वात रमून जावे
उत्कट भावनांनी प्रेम करावे

आठवण त्या प्रसंगाची, त्या व्यक्तिची
सदैव मनात जागृत रहावी
अपघातानेही विस्मरण होऊ नये
दिव्यातल्या ज्योतीसारखी तेवत रहावी

# एकमेका पाहू पाण्यात

ही कविता स्विमिंग टँकवरच्या
कलंदर मेंबर्सची आहे.

पिगॅससच्या टँकवर
पोहणायांची मांदियाळी
कुणी पाण्यात चालती
कुणी पाण्यात डुंबती
कुणी उड्या मारती
कुणी डायलॉग मारती

उन असो पाऊस असो थंडी असो
पोहण्यात कधी खंड नसो
आद्य जलतरणपटू अशी टँकवरची किर्ती आहे
आठवले काकांची स्मृती नेहमीच जागृत आहे

हार्बर वेस्टर्न सेंट्रल ट्रॅक ठरवले
टँक बरोबर इतरत्रही अड्डे जमवले
कधी छोट्या मोठ्या सहली आखल्या
कधी मेजवानीचे बेत ठरवले
जे अनुपस्थित राहिले त्यांनी
रविवार मात्र नाही चुकवले

रविवारची सकाळ तर फारच छान
मनसोक्त डुंबणे हे एकच काम
गप्पांबरोबर रुचीच्या कटिंगची चवच न्यारी
घरी जाऊन करायची असते न्याहरी

# सुख दुःख

हे तर जन्माचे सोबती.
त्यांचा माणसाच्या जीवनावर
सर्वात पहिला अधिकार त्यामुळे
त्यांच्याशी प्रामाणिक राहायलाच हवे.

दुःख पाहता जवा एवढे
सुख पर्वता एवढे
दुःखाची काय ती व्यथा
सुखाच्या तर सुरस कथा

दुःखाचे ओझे किती असे
सुखापुढे क्षुल्लक भासे
दुःख नसते उगाळायचे
सुख असते कवटाळायचे

सुख दुःख हे खेळ मनाचे
कधी लपंडाव तर कधी पाठशिवणे
कधी हसावे तर कधी रडावे
कधी जिंकावे तर कधी हरावे

दुःखाला सुखाची झालर
सुखाला दुःखाची किनार
सुखाशिवाय दुःख नाही
दुःखाशिवाय जीवन नाही

सुखदुःख आयुष्याचे सोबती
कधी एकमेकांवर मात करती
दुःखी असताना सुख शोधावे
सुखी असताना दुःख न विसरावे

# ते मंतरलेले दिवस

हि कविता महाविद्यालयीन आयुष्यात अनुभवलेल्या समस्त विद्यार्थ्यांच्या भावनांची प्रतिक म्हणून लिहिली गेली.

सय येता त्या दिसांची
अंगावर रोमांच उठती
सय येता त्या दिसांची
मन कावरे बावरे होती

तिचे ते चोरुन पाहणे
नजर भिडता मान वळवणे
कधी गोड हसणे तर
कधी लटके रागावणे

तिच्या जाण्याने मन उदास होई
तिचे नसणे अस्वस्थ करी
तिच्या वाटेकडे डोळे लावता
तहान भूक हरपून जाई

दिवस ते शाळेतले
कधी न विसरणारे
चोरून एकमेकास पाहणे
मनास हुरहूर लावणारे

ते दिवस कधी सरले
परिक्षेच्या निकालाने डोळे उघडले
वास्तवाच्या जाणीवेने झोप उडाली
मृगजळामागचे धावणे संपले

अशाच एका वळणावर भेट झाली
सुकलेल्या जखमेवरची खपली उडाली
क्षणभर मन भूतकाळात रमले
वर्तमानाच्या जाणीवेने पुनः भानावर आले

# तेथे कर माझे जुळती

एक दैवी वरदान आणि माझ्यासाठी
शब्दांच्या पलिकडले व्यक्तिमत्व.
यांच्यावर कविता लिहिणे
अ, आ, इ, ई  गिरवण्याइतके
महत्वाचे होते.
कवितेचे नाव सुचत नव्हते
आणि पहिल्याच कडव्याची
शेवटची ओळ ही इतकी भावली
की प्रत्येक कडव्यात तिची
पुनरावृत्ती करावी असे वाटले.
त्याच्या इतके समर्पक शीर्षक
दुसरे असूच शकले नसते.

काय बोलावे, किती बोलावे
कितीही उपमा अपुया पडती
साक्षात सरस्वतीचे रुप जिथे
तेथे कर माझे जुळती

तिच्या आवाजाने मंत्रमुग्ध व्हावे
तिच्या सहवासाने समृध्द व्हावे
जिच्या तानेने कमळे उमलती
तेथे कर माझे जुळती

ओजस वाणीने रोमांच उठती
अमृतस्वराने शब्द सुवर्ण बनती
आर्त स्वराने शब्दांचे भाले होती
तेथे कर माझे जुळती

स्वरांची त्या ताकद तरी किती
यमलोकातून प्राण परत येती
निराश मनाला उभारी देती
तेथे कर माझे जुळती

संगीतातले अढळ स्थान असे
धृव तायालाही ज्याचा हेवा वाटे
दिग्गजही जिथे नतमस्तक होती
तेथे कर माझे जुळती

अनंत उपकार तिचे आम्हावरती
जन्मोजन्मी कधी न फिटती
तिच्या सेवेत आयुष्य वेचावे हेच एक मागणे असती
तेथे कर माझे जुळती

# हे ईश्वरा....

सर्वशक्तिमान परमेश्वरावर कविता झाली
नाही तर ही कला अपूर्णच म्हणावी लागेल.

तुझी अगाध लिला
तुझे रुप लोभसवाणे
चरणी तुझ्या देह अर्पिला
जन्म हा सफल झाला

रुपे तुझी अनेक
नावे तुझी अनेक
शोध घेता तुझ्या अस्तित्वाचा
उकलती गूढ अनेक

नित्य तुझी आरती गावी
षोडशे तुझी पूजा बांधावी
नाम तुझे अविरत घ्यावे
गाथा तुझी सकळांसी सांगावी

तुझे अस्तित्व चराचरी
भक्त फुका वणवण करी
तुका म्हणे विठोबाचा
शोध घ्या आपुल्या अंतरी

पीडीतांचा तू कैवारी
दुर्जनांचा तू संहारी
सृष्टीचा तू पालनहारी
पांडुरंग हरी पांडुरंग हरी

# बन्सी दादा

हे आमचे एक स्नेही.
कोल्हापूर येथे सोन्या चांदीचे व्यापारी.
निमित्त होते वयाची पन्नास वर्षे झाली त्याचे.


व्यापारी तुम्ही सोन्या चांदीचे
हियांचे जड जवाहियांचे
व्यक्तिमत्वाचे विविध रंग असे
जसे पैलू कोहिनूर हियाचे

उत्साह असा हा दांडगा
पंचविशिला लाजवून सोडे
आळसावलेली पुढची पिढी
उठता बसता खाती जोडे

श्यामलाची सोबत अशी
सावलीलाही हेवा वाटे
सहचारिणिचा स्पर्श होता
फुले होऊनी जाती काटे

मुरली आणि गिरी
जसे दोन हाथ
संजू आणि सोनाली
हम है साथ साथ

दिवस हा सोनियाचा
तुला होती सोन्या चांदीची
हृदयाची बनविली कोंदणे
स्थापना करावया अनमोल हियाची



# अनंताची जत्रा

ही अनंत इंग्लिश स्कूल, सातारा
१९८५ च्या १० वी च्या बॅचच्या मित्र मैत्रिणींवर
लिहिलेली कविता आहे.

अनंत इंग्लिश स्कूलची जत्रा
पंचवीस वर्षांनी पुनः भरते
बिछडे हुए पुराने साथी
जी भरके गले मिलते

बळ घेऊन पंखात उडाली पाखरे
जत्रेच्या ओढीने परत फिरती सारे

चाळीशीच्या उंबरठ्यावरती
गरज छोट्या विश्रांतीची
गेट टुगेदरच्या निमित्ताने
उजळणी होते भूतकाळाची

प्रपंचाचा गाडा हाकता
दमछाक होते प्रत्येकाची
घटकाभराच्या विरंगुळ्यानंतर
सुरुवात पुढील प्रवासाची

पुनः भेटीच्या वायद्याने
पांगापांग होती
फोन आणि ईमेल द्वारे
ई जत्रेत भेटती

# प्रतिक्षा

ही कविता कशी, कधी, का सुचली
ह्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे.
पाहूया कोडे कधी उलगडते ते.

वाट पाहण्याची सवयच होऊन गेली होती
तू कधी येशील ही आशा खोटी ठरत होती
तीस वर्षांचा विरह ही मोठी शिक्षा होती
आता शिक्षा संपेल ही तरी कुठे कल्पना होती

मन कधी उल्हसित होते आहे
तर कधी उदास होते आहे
तुझ्या सुखद आठवणीने
पुनः उभारी घेत आहे

तुझे रुप किती सुंदर
तुझा आवाज किती मधुर
तुझे नाम असे समर्पक
करी उदासिनता दूर

कल्पना सुध्दा करवत नाही
तुझ्यावाचून जगण्याची
तुझ्या येण्याने संपली
प्रतिक्षा अनेक युगांची

स्वप्ने पहात झोपी जावे
स्मरणाने तुझ्या जाग यावी
वाट पाहतो आहे कधीची
तुझ्या एका गोड हाकेची

# हरवलेले बालपण



चा इतिहास हा शाळेतील सोबती
आणि त्यांची भेट इथून सुरु झाला.
कराड येथे शाळेतील मित्रांची
नियमित भेट होते.
उपस्थित रहाणे शक्य नसल्याने
कविता लिहून भावना व्यक्त करण्याचा
प्रयत्न केला.

फोन येता बालमित्रांचा
मने उल्हसित होऊन जाती
विस्मृतीतल्या आठवणी
ताज्या होऊन येती

परस्परांच्या भेटण्याच्या ओढीने
पाऊले आपोआप वळती
आठवणींच्या उजळणीने
मने गहिवरून जाती

काय बोलावे किती बोलावे
भान उरत नाही
मैत्रिणींचा विषय निघता
दुसरे काही स्मरत नाही

हरविलेले नसते बालपण
आपणच असतो हरवलेलो
आयुष्याच्या रहाटगाड्यात
सगळीकडून पिचलेलो

बालमित्रांच्या भेटीने
थोडासा विरंगुळा होतो
मनाचा कोंडमारा
काहीसा कमी होतो

पुनः भेटीच्या वायद्याने
पांगापांग होती
ई प्राण्यांच्या जंगलात
पुनः सर्व हरविती

# शिमगा



ही कविता आधी ठरवलेल्या
विषयावरची आणि मुद्दाम ठरवून लिहिलेली.
त्यामुळेच कदाचित तेवढी परिणामकारक
होऊ शकली नाही.

शिमगा सण मोठ्ठा
नाही आनंदा तोटा
फाल्गुन महिना येती
टिमकी वाजू लागती
शिमगा सण मोठ्ठा
नाही आनंदा तोटा

दाखवुनी नैवेद्य होळीला
नारळ पुरण पोळीचा
प्रदक्षिणा घालीत शंखनाद
करिती दुष्ट प्रवृत्तीचा
शिमगा सण मोठ्ठा
नाही आनंदा तोटा

पेटता होळी उठतो आगीचा डोंब
एकमेकांच्या नावाने मारायची असते बोंब
शिमगा सण मोठ्ठा
नाही आनंदा तोटा

दसरा दिवाळी सणांची
सर्वच करिती प्रतिक्षा
अग्निदेवाचे प्रतीक असलेल्या होळीची
का बरे करावी उपेक्षा
शिमगा सण मोठ्ठा
नाही आनंदा तोटा



# Beer

बीयर बद्दल काही न बोलणे हेच ठीक,
परंतु लिहिण्याचा मोह काही आवरता आला नाही.

When there is beer
You need not fear
You have to just cheer
Once you have beer
Everything is clear
Gone all the tear
Believe me my dear
Happiness and happiness sheer
Just offer others beer
And there is no peer
When you have beer
Its enjoyment mere
You have beer
Then everything is on rear
You have beer
You will find everything near
You have beer
You will change gear
So my dear
Always have beer



व्यावसायिक हेतूने चंदुकाका सराफ
यांच्याशी संबंध आला
त्या दरम्यान ही कविता सुचली.

चंदुकाका सराफ अँड सन्स
केवळ नाव असे पुरेसे
देण्या शुध्दतेची ग्वाही
परंपरा अशी दोन शतकांची
शोधून सापडणार नाही

बारामतीच्या मातीत रुजले
एक रोपटे वटवृक्षाचे
घाम शिंपित त्यासी वाढविले
बहुशाखांनी विस्तारिले
अलंकारांनी मढविले

ग्राहक सेवेचे व्रत घेउनी
नाविन्याची जोड देऊनी
अजोडतेची कास धरुनी
कलात्मकतेची दृष्टी ठेवुनी
परिपूर्णतेचे ध्येय बाळगूनी
क्षितिजाची ही वाट चालती
चंदुकाका सराफ अँड सन्स
एकमेव हे नाव असती

# आणि भांडण सुरु झालं...

या विषयावर कोणीतरी लिहिलेल्या
काही ओळी मेलवर वाचावयास मिळाल्या
तोच धागा पकडून आपल्याला काही
सुचते का हा प्रयत्न करुन पाहिला

भांडी खूपच जुनी झालीत
नवी घ्यायला हवीत
म्हणून बोहारणीला बोलावून आणली...
आणि भांडण सुरु झालं

हा पहा घरी केक केला मी
टेस्ट तर करा
जे पदार्थ बाहेर चांगले मिळतात
ते घरी करु नयेत...
आणि भांडण सुरु झालं

ऐय्या किती छान साडी
असे मैत्रीण म्हणाली
खराब साडी पाहणे आमच्या नशिबातच नाही
... आणि भांडण सुरु झालं

पहा एकेक नवरे
बायकोसाठी काय काय करतात
म्हणून सायकल घेऊन आले
... आणि भांडण सुरु झालं

माझ्या भाचीचं लग्न ठरलंय
एक छानशी साडी घ्यायचीय
सध्या खूप सेल लागलेत
जुन्या पाच साड्यांच्या बदल्यात नवी
एक कुठे देतात का? असे विचारले
... आणि भांडण सुरु झालं



# आयुष्य

ही कविता देवपूजा करीत असताना सुचलेली.
देवपूजेतील बहुतेक क्रिया शब्दांत व्यक्त
करण्याचा प्रयत्न केला.

तेवत रहावे समईसारखे
देह जाणावा देव्हायासारखा

बोलत रहावे मंत्रोच्चारासारखे
जीवन उगाळावे चंदनासारखे

भाळी विसावे अष्टगंधासारखे
दरवळत रहावे अत्तरासारखे

रंग भरावे हळद कुंकवासारखे
निर्मळ आणि शुध्द असावे तीर्थासारखे


गोड असावे नैवेद्यासारखे
वाहून घ्यावे फुलासारखे

जळून जावे कापरासारखे
सुगंधीरुपे उरावे उदबत्तीसारखे

ओवाळत रहावे निरंजनासारखे
मुखवाणी असावी आरती सारखी

किणकिणत रहावे टाळ मृदुंगासारखे
नाद करत राहावे घंटेसारखे

प्रदक्षिणा घालावी गणेशासारखी
लोटांगण घालावे पराजिता सारखे



# वाढदिवस

एका मित्राच्या वाढदिवसाच्या निमित्ताने
या कवितेचा जन्म झाला.

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
ईश्वर करो पूर्ण तुमच्या इच्छा
केवळ कोरडे आभार नसावेत
गरीब मित्रांची एवढीच अपेक्षा !

त्रेचाळीस संपून चव्वेचाळीस लागते
तरी हिरवटपणा काही जात नाही
माझ्यासारख्या महापुरुषाने म्हटलेच आहे
जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही !

सुबह और शाम काम ही काम
आज तो करलो भैय्या थोडा आराम
जिंदगी है बस भागने के लिये
इस भीड में गुम हो जाने के लिये !

चलते रहेना है यूं अकेले
पता नही रास्ता कहां ले चले
मंझिल का कोई पता नही
कोई साथ चले ना चले !



# सावली

एका कौटुंबिक स्नेह्यांच्या वाढदिवसा दिवशी
अभिष्टचिंतन म्हणून कविता लिहिली गेली.

देवा ब्राह्मणांच्या साक्षीने
सात पावले टाकून
गानू कुटुंबाची माया
झाली रानडे कुटुंबाची काया

“आनंद” म्हणतो
“मधुरा” माझी सावली
कर्मकांड नवसाने
जणू दुर्गा ही पावली

खांद्याला खांदा लावून
सांभाळे संसाराची धुरा
प्रथमेशला जन्म देऊन
केला त्रिकोण पुरा

मधुराशिवाय आनंद
कुठेही जात नाही
कितीही फुशारक्या मारल्या तरी
तिच्याशिवाय पान हालत नाही

सावलीलाही हेवा वाटेल
अशी मधुराची साथ
एक दोनची काय कथा
कमी पडती जन्म सात

# व्यथा

ही अशीच ठरवून लिहिलेली कविता
खरेतर स्त्री पुरुष संबंधावर मला फारसे
सुचत नाही. सुचले तर ते नकारात्मक
जास्ती असते. कदाचित कमी भावनाप्रधान
असण्याचा तो परिणाम असेल.

तुझ्या ओठातले शब्द
मला ऐकू आले नाहीत
जरी ऐकू आले तरी
त्यांचा अर्थ समजला नाही

तुझ्या मनातले विचार
मला ओळखता आले नाहीत
जरी ओळखले तरी
रुजवता आले नाहीत

तुझ्या हृदयाची स्पंदने
माझ्यापर्यंत पोहोचलीच नाहीत
जरी पोहोचली तरी
त्यांची धडधड जाणवली नाही

तुझ्या डोळ्यातले भाव
मला कळलेच नाहीत
जरी कळले
तरी उमजले नाहीत

तुझ्या वागण्यातला फरक
मला जाणवलाच नाही
जरी जाणवला तरी
माझे वागणे बदलले नाही



# प्रियकरा

खरे सांगायचे तर ही कविता माझ्यासारख्या माणसाला कशी सुचली याचे मलाच आश्‍चर्य वाटते आहे. कदाचित म्हणूनच म्हटले आहे आयुष्य कोष्टकात बसत नाही.

तुझ्या शब्दांच्या जादूने
मी भारावून गेले
तुझ्या अर्थपूर्ण नजरेने
मी घायाळ झाले

तू कधी जवळ आलास
मला ते कळले नाही
जेव्हा कधी कळले
मी माझी राहिले नाही

तुझ्या हळुवार स्पर्शाने
मी मोहोरुन गेले
तुझ्या भावनांच्या आवेगाने
मी थिजून गेले

तुझ्या उत्कट प्रेमाच्या वर्षावाने
मी भिजुनी चिंब झाले
तुझ्या श्‍वासांच्या गंधाने
मी भान हरपून गेले

तुझे अचानक जाणे
मनाला हुरहूर लावून गेले
तुझ्या परत येण्याची
मी वाट पहात राहिले
मी वाट पहात राहिले.......

# आठ

ही कविता ज्यूस कॉर्नरच्या खुर्चीवर बसून सुचली
हातात पेन, कागद काहीच नव्हते
फळवाल्याकडून छोटा कागद, पेन घेऊन
सुरुवात केली. घरी येऊन पुर्ण केली.

आठ हा आकडा मला
कधी लाभत नाही
कितीही टाळायचे म्हटले तरी
पाठ काही सोडत नाही

इंग्रजीतला आठ
उभा असतो ताठ
जणू ब्रह्मदेवाची बांधलेली
न सुटणारी गाठ

मराठीतला आठ
वाकडी करतो वाट
घोकमपट्टी केली तरी
पाढा होत नाही पाठ



म्हणती सकल जन
अशुभ असतो आठ
खरे खोटे देव जाणे
कृष्णाचा नंबर होता आठ

जगात आश्चर्य आहेत
उणी पुरी सात
मला उगीचच शंका येते
मी तर नसेन तो आठ

# Hitler

हे एक भयंकर व्यक्तिमत्व
म्हणून जगाला माहीत आहे.
ज्याच्यामुळे चांगले काहीच झाले नाही.
त्याची जिद्द, महत्वाकांक्षा,
इच्छाशक्ती, राष्ट्रावरचे प्रेम
या गोष्टी मनाला भावतात.
हे सर्व सत्कार्यासाठी वापरले
गेले असते तर एखादे
आश्चर्य जन्माला आले असते.
बाँड चित्रपटातील त्याची
ओळख करुन देण्याची पद्धत
लक्षात राहिलेली होती त्याचा
उपयोग इथे करावासा वाटला.



My name is Hitler, Adolf Hitler

I have the ambition
To conquer the world
I have the ambition
To rule the world

My name is Hitler, Adolf Hitler

I have to ruin
England and France
I have to shine
Germany at a glance

My name is Hitler, Adolf Hitler

I have to become
Napoleon of the age
I have to make free
Germany from the cage

My name is Hitler, Adolf Hitler

The rulers of the country
Put it in to slavery
I appeal my soldiers
To show their bravery

My name is Hitler, Adolf Hitler

Today I am afraid of
Being get defeated
But I am sure that
The history will not get repeated

My name is Hitler, Adolf Hitler

At the moment of death
I apologize my country
You will see one day
World will respect my country

My name is Hitler, Adolf Hitler

# कोकणस्थी बाणा

बरेचसे मित्र कोणकस्थ असल्याने त्यांचा
हट्ट नाही पण हक्क आहे की काही तरी लिहिले जावे.

आपटे भिडे चितळे दामले
एकरांती जमून आले
चित्पावनांचा टेंभा मिरवत
समस्त ब्राह्मण जातीचे प्रतिनिधी झाले

हुशारी यांची अचंबित करणारी
ज्ञानभांडार यांचे थक्क करणारे
कला यांची स्तिमित करणारी
वक्तृत्व यांचे मंत्रमुग्ध करणारे

नीटनेटका, व्यवस्थितपणाचा आदर्श घ्यावा
कंजूषपणाकडे काणाडोळा करावा
बुध्दीची देवता यांना असे प्रसन्न
विक्षिप्तपणा थोडा खपवून घ्यावा

पिढीजात गरिबीच्या जाणीवेने
दात कोरुन पोट भरती
गडगंज संपत्ती आली तरी
चिंगुसपणा न विसरती

अभिमान असावा कोकणस्थ असण्याचा
वसा घ्यावा समाजसुधारणेचा
अंगी बाणावा कोकणस्थी बाणा
त्याहून महत्वाचा मराठी बाणा

# निसर्ग

ही कविता जन्माला येण्यामागे
कन्या रमा हिची प्रेरणा होती.
एक दिवस तिने निसर्गावर एखादी
कविता आहे का असे विचारले कारण
शाळेतून आणावयास सांगितले होते.
जमले तर मीच लिहून बघतो असे तिला
सांगितले आणि खरोखरच त्या रात्री
लिहून तयार झाली.


आहे तो एक मोठ्ठा जादुगार
करितो रोज नवीन चमत्कार
विराटतेचे दर्शन होता
होई ईश्वराचा साक्षात्कार

पाहून प्रयोग त्याचे नवे
आश्चर्यचकित होऊनी जावे
सौंदर्याची उधळण होता
डोळ्यांचे पारणे फिटूनी जावे

कधी रुद्ररुप धारण करुन
तांडव नृत्याचे दर्शन घडवितो
अथांग महासागराच्या रुपाने
विशालतेची जाणीव करुन देतो

वसंत ऋतू चैतन्य पसरवितो
ग्रीष्माचा दाह होरपळून काढतो
वर्षाचा मेघ हिरवा गालीचा अंथरतो
शिशिर हुडहुडी भरायला लावतो

संतुलित जीवनाचा कानमंत्र देणारा
निसर्गासारखा दुसरा शिक्षक नाही
त्याची ताकद ज्याने अनुभवली
नतमस्तक झाल्याशिवाय राहिला नाही



# काही सांगायचे राहून गेले

ही कविता देखील आधी सुचलेल्या विषयावरची
ताज विवांता, गोवा येथे डिनर टेबलवर बसून लिहिलेली

उजळणी तर खूप केली पण
धाडस कधी नाही झाले
इतर बरेच बोलून गेलो परंतु
काही सांगायचे राहून गेले

जे तुझ्याशी बोलायचे होते ते
स्वतःशीच बोलत गेलो
विचारांच्या तंद्रीत हरवून गेलो
अन् काही सांगायचे राहून गेले

तुझी वाट पाहून थकून गेलो
डोळा कधी लागला कळले नाही
स्वप्नात तुझ्याशी खूप बोललो तरी
काही सांगायचे राहून गेले

तुझे भेटणे आता दुर्मिळ झाले
अवचित कधी सामोरी येता
शब्द माझे ओठातच विरले
अन् काही सांगायचे राहून गेले

अजुनही तुझी वाट पाहत आहे
तुझ्या येण्याची आशा जरी संपली
खंत मनाला लागून राहिली
काही सांगायचे राहून गेले



# वाह ताज

गोव्याहून परतीच्या वाटेवर बस मध्ये सुरु केली
जेवण्यासाठी थांबलेल्या हॉटेल मध्ये
मसाला दूध पीत पूर्ण केली

गोवा की धरती पर है
एक सुंदर बसेरा
ताज विवांता है नाम
जैसे घर हो हमारा

नजर उठाके देखलो
सामने है समंदर
कही जाना न पडे
सब कुछ है अंदर

खाना ऐसा मिले
जिसका कोई नहीं जवाब
खिदमत ऐसी करे
जैसे हो आप कोई नवाब

आना है यहां बार बार
रहना है आराम से
चाहे छुट्टीयां मनानी हो
या किसी काम से

खुशियाँ ऐसी हो जिसका
कोई दाम नहीं होता
ऐसी जगह जाना नहीं
जहां ताज नहीं होता

# पुकार

ही कविता एका हिंदी गाण्यावरुन सुचली. नायक नायिकेला आयुष्यात निराश न होता धारिष्ट्याने परिस्थितीला कसे सामोरे जावे हे सांगण्याचा प्रयत्न करतो आहे.

ये झुकी हुई निगाहे
उठाके तो देख लो
बहार छायी हुई है
ये सिले हुए होठ
खोल के तो देख लो
हंसी आयी हुई है

बाहें फैलाये हुई है
एक खुशी भरी जिंदगी
कोई पुकार रहा है तुम्हें
इसे मोहब्बत कहो या दिवानगी

सर झुकानेसे कुछ नहीं होता
सर उठाओ तो कोई बात बने
यूँ चुप रहनेसे कुछ नहीं होता
कुछ कहो तो कोई बात बने

ये दुनिया बडी बेरहम है
तुम्हें कुछ कहने न देगी
रह जाओगी कभी तुम अकेली
किस्मत भी तुम्हारा साथ न देगी



पोंछकर अश्क अपनी आँखोंसे
मुस्कुराओ तो कोई बात बने

# हँडसेट

हा विषय एका स्नेह्यांनी सुचविलेला
निमित्त होते बिघडल्यामुळे वेळेवर
न चालणा-या हँडसेटची इ स्टोरी

हँडसेट आणि बायको
दोन्हीत साम्य काय असते
थोडे थांबलो असतो तर
अजून चांगले मॉडेल मिळाले असते

हँडसेट आणि बायको
दोन्हीत फरक काय असतो
बायको बदलता येत नाही
हँडसेट मात्र बदलता येतो

हँडसेट कधी खेळणं असतो
कधी मनांना जोडणारा दुवा असतो
कधी वेळ घालवण्याचं साधन असतो
कधी वेळ वाचवण्याचं उपकरण असतो

लहान मोठ्यांना त्याचे आकर्षण असते
तरुणाईला त्याचे वेड असते
महागड्या हँडसेटची उपयुक्तता कमी असते
स्टेटस सिम्बॉल म्हणून ओळख जास्त असते

हँडसेट हाती येता भान हरपुनी जाते
संवाद टाळण्याचे कारण होऊनी जाते
होऊनी गुलाम त्याचे आपण
विसरुनी गेलो नात्यांचे आपलेपण



# नाती-गोती

हा विषय आधी सुचलेला आणि लिहून ठेवलेला. रविवारी सकाळी एका निवांत क्षणी कविता स्फुरली आणि पूर्ण झाली.

एखादा नातेवाईक असतो तहेवाईक
खायला कहार आणि भुईला भार
न सांभाळावा तर होते पंचाईत
सांभाळावा तर तोंड दाबून बुक्क्यांचा मार

काही नाती असतात हवीहवीशी
काही झालेली असतात नकोशी
धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय
खपणाया बैलाला कोण विचारतंय

काही जण असतात बिचारे एकटे दुकटे
तर काही जणांकडे उभे गोतावळे
असून अडचण नसून खोळंबा
जणू पिंडाला शिवणारे विवक्षित कावळे



नातीगोती असतात जपायची
जशी आयुष्याची शिदोरी
भान ठेवून ताणायची असते
न तुटण्या इतपत दोरी

नात्यांचे महत्व ज्याला नसते
गोत्यात आल्याशिवाय रहात नाही
एकटेपण खायला उठते तेव्हां
पश्चाताप करण्या शिवाय काही रहात नाही

# दिक्षितांची माधुरी

निमित्त होते शेजारी राहणाया लिमये कुटुंबाची माधुरी नातेवाईक असल्याने त्यांच्याकडे येईल तेव्हा आपल्याला भेटेल का यावर रमा आणि माझे बोलणे झाले तो प्रसंग.

दिक्षितांची माधुरी.....

लाखो हृदयांची धडकन अशी
सहजसुंदर अभिनयाचा मानबिंदू जशी
मनमोहक सौंदर्य जणू बावनकशी

दिक्षितांची माधुरी.....

अबोध बनून पदार्पण केले
सैलाब आणून हाहाकार माजवला
गजगामिनी होऊन संचार केला

दिक्षितांची माधुरी.....

तेजाबच्या स्पर्शाने झळाळून निघाली
बॉलिवूडची सुपरस्टार ठरली
नेने कुटुंबाची गृहिणी बनली

दिक्षितांची माधुरी.....

तमाम तरुणाईची ती धडधड होती
हुसेन आदि जेष्ठांची ची हळहळ होती
सह कलाकारांची ती जळजळ होती

दिक्षितांची माधुरी.....

महाराष्ट्राची तू सुवर्णकन्या आहेस
रसिकांच्या दिलकी तू मलिका आहेस
झलक दिखला जा ची तू शिल्पकार आहेस



निमित्त होते स्वतःच्या वाढदिवसाचे.
या निमित्ताने तरी खरे बोलता येते
का पहावे म्हणून लिहिले.

कोणी म्हणती मला अहंकारी
कोणी म्हणती मला निरंकारी
कोणी म्हणती मला अविचारी
कोणी म्हणती मला निर्विकारी

स्वभाव असे हा माणूसघाणा
थोडा स्वार्थीपणा, थोडा विक्षिप्तपणा
भावनिकतेचे वावडे यांच्या
नसानसात भरलेला व्यवहारीपणा

कोणी निंदा अथवा वंदा
फुशारक्या मारणे हा आपुला धंदा
साजेशी परंपरा साजेसं घराणं
स्वतःपुरतं पाहणं आणि स्वतःपुरतं राहणं

जीवन असे एक महायात्रा
नियती पुढे चालत नाही कोणतीच मात्रा
ठेविले अनंते तैसेची रहावे
कर्म अपुले करीत रहावे

काय मिळविले काय गमविले
न व्हावे धुपाटणे आयुष्याचे
समाधानाचे जगणे आणि समाधानाचे मरणे
अनंत उपकार असती महा गणेशाचे ।।




ई टेक्नोलॉजी बद्दल असलेले जुन्या पिढीचे
मत मांडण्याचा प्रयत्न करुन पाहिला

It is our brain or server
Working 24/7, rest is never
Facebook, Twitter, Youtube, Whatsapp
Windows, Android or ERP, SAP

Playing all the time SMS or email
Fair of technology missing male and female
Writing on a blog is a new fashion
Wishes with a greeting card is out of fashion

Take care, be in touch
Words and words with dry expressions
Feeling and emotions are simply missing
High end models are only for impressions

People get surprised to know
I am not on face book
My simple answer to them is
I believe in face not in book

Height of technology
A male zipped, attached
And sent on mail
Received, downloaded and
Unzipped a female

# शब्दांची किमया

एका बँकेच्या जाहिरातीतील साधे दस्त ऐवज मधील "दस्त" या शब्दावरुन सर्व शब्द सुचले आणि त्याची कविता बनून गेली

आयुष्य असे एक दस्त
रहावे आपण त्यात व्यस्त
कधी होऊ नये त्रस्त
समाधान आणि शांती फकस्त

तुमच्या आयुष्याचे तुम्हीच विश्वस्त
जागरुक असा जशी गस्त
दुर्लक्ष करा असो महाग वा स्वस्त
करा प्रयत्नांची शिकस्त

मिळून जाईल अमूल्य जस्त
मिळालेले सर्व नका करु फस्त
अन्यथा होऊन जाल त्रस्त
मग चुकवावे लागतील किस्त

म्हणूनच व्यवहार असावेत रास्त
ठेविता स्वतःवर अवास्तव भिस्त
जर पाळली नाही शिस्त
होऊन बसेल सर्व अस्ताव्यस्त

जर व्हाल कधी आक्रस्त
कठीण होईल करणे दुरुस्त
टळणार नाही मग अस्त
करा इतरांची वास्तपुस्त

वागू नका कधी भिडस्त
ठेवू नका अपेक्षा जास्त
आखडता ठेवू नका हस्त
उपभोगावे हे आयुष्य मस्त

# आशा

ही कविता आधी खोटी आशा या नावाने ठरवली होती पण नकारात्मक विषय नको म्हणून नाव बदलले.

मनाला भुरळ पाडते
चित्त प्रफुल्लित करते
दुःख विसरायला लावते
आयुष्याला उभारी देते

वाट पहायला लावते
सुखी स्वप्न रंगवते
अपयश पचवायला शिकवते
यशाची अपेक्षा वाढवते

निराशेवर मात करते
आशेवर जगायला शिकवते
सकारात्मक विचार रुजवते
आश्चर्यकारक गोष्टी घडवते

कधी खोटी ठरते
तर कधी खरी होते
खोटी धीर खचवते
खरी बळ वाढवते

आयुष्याचा गाडा हाकते
विचार करायला लावते
संकटांचा मुकाबला करते
प्रेम करायला शिकवते



# बाबा

हो कविता सुचण्यामागे कारण असे की एका स्नेह्यांनी सकाळ मधील कविता पाठवा ही बातमी कळवली. केवळ ह्याच विषयावर कविता हवी होती आणि संग्रहात तर नव्हती.

कोणी म्हणती बाबा
कुणी कॉलिंग डॅडी
नावापुरता आदर हा
बाकी असे रामा गडी

मुलाबाळांच्या सुखाकरिता
दिवस रात्र कष्ट उपसती
संसारचा गाडा हाकताना
स्वतःचे अस्तित्व विसरून जाती

बाबा हा मित्र असावा
भीती कधी वाटू नये
चांगल्या वळणासाठी धाक असावा
दहशतीचा त्याला रंग असू नये

पुरुषी अहंकार गळून पडती
जेव्हा लेक सासरी जाती
दबलेल्या भावनांचा बांध फुटून
गंगा जमुना वाहू लागती

फुकटची मिजास करायला
बाबाच्या नावाची गरज असते
मुलाच्या आधाराची खात्री नसते
बाबाच्या आधाराची मात्र शाश्वती असते

# मला काय करायचयं ?

ही कविता सुचण्यामागे आपण
किती स्वार्थी आणि
निष्क्रिय झालो आहोत ही
मनाला दुखावणारी भावना होती

चोर झालेत शिरजोर
रक्षक झालेत मुजोर
माझं काय जातंय
मला काय करायचय

रस्त्यावर कोणी तडफडतय
कोणी कुणाला लुबाडतय
कुंपणच शेत खातंय
मला काय करायचय

नैतिकतेची चाड उरली नाही
गरिबाला वाली उरला नाही
सर्वत्र चंगळवाद बोकाळलाय
मला काय करायचय

नैतिक मूल्ये हरवत चाललीत
नातेसंबंध बिघडत चाललेत
संस्कृतीचा -हास होत चाललाय
मला काय करायचय

मी, माझे कुटुंब एवढेच माझे विश्व
कोणी जगो अथवा मरो
माझं काय जातंय
मला काय करायचय

Pegasus
A Health Club

*The reason to inspire was the occasion of Anniversary and the association of many years.*


The place to build
The place to swim
The place to dance
All at a glance

Diet your food
Make your mood
Have fun and fair
Unlike any where

Join the gym
Get slim trim
Yoga by passion
Aerobics like a fashion

Openers are the seniors
Dancers are the juniors
Adult prefer slow but steady
The crew is ever ready

Once you join
It's an attachment
Even if you leave
Difficult to get detachment



# ऊन पाऊस

काही कवितांचे विषय हे जसे सुचले तसे लिहून
ठेवले गेले. कविता नंतर तयार होत गेल्या,
हा विषय असाच आधी सुचलेला.

श्रावण मास येती
ऊन पाऊस खेळ खेळती
कधी ऊन पडे कधी पाऊस पडे
लोकांची मात्र तारांबळ उडे

उन्हाळ्यात पाऊस येतो
वळीवाचे त्याला नाम असे
पावसाळ्यात ऊन पडता
उघडीप त्याला म्हणती असे

उन्हाळ्याचा दाह असह्य होतो
वळीवाचा शिडकावा हवाहवासा वाटतो
पावसाळ्याची चाहूल लागता
मयूर वेडा होऊनी नाचू लागतो

वसंत ऋतु धरती फळा-फुलांनी सजवतो
आषाढ ऋतु वसुंधरेला हिरवा शालू नेसवतो
वैशाख वणवा सृष्टीला होरपळून काढतो
भाद्रपदातला वरुण अरुंधतीला चिंब भिजवतो

उन्हाळ्यानंतर पावसाळा, पावसाळ्यानंतर पुन्हा उन्हाळा
मध्येच डोकावून जातो थोडासा हिवाळा
जीवनातले ऋतुही ऊन-पावसासारखे
बदलले की भासतात उबदार हिवाळ्यासारखे




*The occasion was the Teacher's Day*

A man or an institute
Short of words to constitute

Teaching Accountancy
Is a passion
ICAI of a global standard
Is an ambition

Six am on the platform
An idol of a dedication
Years on years without break
Consistency is an indication

Arjun and Eklavya were
Famous for their feature
Dronacharya was known as
One and the only teacher

Do we get only knowledge or
We get an inspiration
Getting the degree is a routine
Most important is an aspiration

Teacher's day is not a celebration
In true sense it's a deliberation

# सुंदरा सातारकर

अनेक विचारातून सुचलेली कविता

एक होती सुंदरा
जशी स्वर्गातील अप्सरा
नाना कळी अंतरा
जणू रामायणातील मंथरा

ओठ गुलाबी
डोळे शराबी
अदा नवाबी
हजर जबाबी

अवचित एकदा दिसली
ओळख दाखवेल तर ती कसली
कशीबशी तिला गाठली
आठवत नाही म्हणाली

काय ती दिसते
बरे मैद्याचे पोते
पूर्वी शब्दांत बसेना
आता डोळ्यात मावेना

नवरा म्हणावा की टकलू हैवान
पोरं एका पेक्षा एक सैतान
मला भेटून गहिवरली
आता म्हणते तिची बस चुकली

# नंदू सबका बंधू

आमचे सख्खे शेजारी आनंद रानडे
यांच्या वाढदिवसा निमित्त

आनंद रानडे एक ध्यान
मूर्ती लहान पण किर्ती महान
तबला छान वाजवतो
तितकेच ऑफिसही गाजवतो

Always charged like eveready
Always late to get ready
A friend in need
is Anand indeed

आवड आणि छंद
तबला आणि खेळ
सोन्याहून पिवळे जर असेल
जोडीला डोसा आणि भेळ

सुबह और शाम
काम हि काम
लोग चाहे कुछ भी कहे
हम है  जोरु के गुलाम



नातेवाईक आणि शेजारी
मित्र आणि मैत्रिणी
देती वाढदिवसाच्या शुभेच्छा
गाउनी आनंद गाणी

# दिन विशेष

एक होता राजा एक होती राणी
गोष्ट तशी जुनी पुराणी
निमित्त आहे आज मितीचे
सांगतो नव्याने तीच कहाणी

व्हॅलेंटाइन दिन उगवला
राजा उत्साहाने तयार झाला
फूल गुलाबाचे घेऊन हाती
राणीला भेटावयास गेला

गुपित राणीच्या मनातले
राजाला न कधी उमजले
प्रेम व्यक्त करण्याचे
सारे प्रयत्न निष्फळ ठरले

दिवस मावळतीला आला
विचार संपले शरीर थकले
निराशेच्या अंधाराने
जीवन झाकोळून गेले

काही कटू काही गोड
उरल्या त्या आठवणी
चालणे फक्त आपल्या हाती
मग राजा असो अथवा राणी






कोणतेही निमित्त नसताना

प्रेम म्हणजे काय
मनाची एक अवस्था
आनंदा येई उधाण
अन्यथा व्यथा निव्वळ व्यथा

आयुष्यभर वाट पहायला लावते
कधी आयुष्याची वाट लावते
प्रेम प्रेम म्हणजे प्रेम असते
सेम टू सेम कधीच नसते

ज्याला मिळते त्याचे कौतुक होते
न मिळते त्याचे माकड होते
प्रेमात जो पडतो तो पडतच जातो
जो पडत नाही तो धडपडत राहतो

असे म्हणतात प्रेमात सगळे माफ असते
कधी कधी आयुष्यही साफ होते
अपयश आले तरी प्रयत्न थांबत नाहीत
कितीही वाटले तरी झरे कधी आटत नाहीत

स्त्रियांची अडचण अशी
एकाच्या पुढे जात नाहीत
पुरुषांची जात अशी
एकाने कधी भागत नाही

प्रेमा तुझा रंग कसा
जो फासाल तसा
प्रेमा तुला उपमा किती
द्याल तेवढया कमी पडती

म्हणतात प्रेम आंधळे असते
म्हणूनच तर ते प्रेम असते
उघड्या डोळ्याने करतात त्याला
लग्न असे नाव असते

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असते
सेम टू सेम कधीच नसते

वाढदिवसाचे
निमित्त

# सोनाली
## एक मैत्रीण

फार फार वर्षांपूर्वी
महाराष्ट्रातल्या करवीरनगरी
एक नमुना जन्मास आला
अलका गुळवणींच्या उदरी

रंग रुप नीट नेटके
बोलणे वागणे जरा हटके
राहते मिसळून सगळ्यांशी तरी
अधून मधून उडती खटके

प्रेमात एकदाच पडली तरी
अजूनही धडपडत असते
एम एल जी ची परंपरा
अजूनही सांभाळून असते

असा नमुना पत्करणे
हे काम नाही खायचे
बिचारा गिरी खरंच धीराचा
आपल्याच्याने नाही जमायचे

A friend in need
Is Sonali indeed
Whether you believe or not
It's a lifetime deed



श्री. विजय अष्टेकर हे कॉमर्स ग्रॅज्युएट तसेच सी.ए. आणि सी.एम.ए. आहेत. ते १८ ऑक्टोबर १९९४ पासून सी.ए. म्हणून स्वतंत्र व्यवसाय करतात. त्यांचे शालेय शिक्षण टिळक हायस्कूल, कराड; एच.एस.सी. सावित्रीबाई फुले (वेणूताई चव्हाण) कॉमर्स कॉलेज, कराड आणि बी. कॉम गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे येथे झाले.

ऑगस्ट २०१२ पासून त्यांनी कविता लिहिण्यास सुरुवात केली. संगीताची त्यांना आवड आहे. त्यातले किती कळते हा भाग सोडला तर संगीत आणि चित्रपटांचे खानदानी वेड असल्याने माहिती बयापैकी आहे.

चित्रकला चांगली होती असे म्हणावे लागेल, कारण शाळा सुटल्यानंतर ती मागे पडली ती पडली. परंतु तिच्या आठवणी काही चित्रांच्या रुपात जागृत आहेत.

गाडी चालविण्याची हौस आहे. एकांतप्रिय स्वभाव. कदाचित कला जोपासण्यासाठी तो आवश्यक असावा. कंटाळा न करता काम करायला आवडते. खाण्या-पिण्याची आवड असली तरी डाएट च्या नावाखाली त्यावर बंधने आहेत.

© विजय अष्टेकर
संदीप सोसायटी, सेवासदन स्कूल समोर,
एरंडवणे, पुणे-४११००४.

खाजगी वितरणार्थ